नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १४/०७/२०२६ (मंगळवार)

## मोटर सायकल चोरीचे ०६ गुन्हे उघड,
## ९ मोटार सायकल किंमती ४ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त
## कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :– मा. श्री. हर्ष पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री सागर खर्डे उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली कळमेश्वर पोलिसांनी मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांची यशस्वी उकल केली आहे.

कळमेश्वर पोलीस दिनांक १४/०७/२०२६ रोजी मोटर सायकल चोरीचे गुन्हयांच्या तपासात पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असता त्यांना गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून पोस्टे कळमेश्वर अप. क्र. ६४८/२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं. चे गुन्हयात पाच विधीसंघर्षग्रस्त बालक यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न केले. त्यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे कौशल्यपुर्ण तपास करीत विचारपुस केली असता त्यांनी पोलीस स्टेशन कळमेश्वर, पोस्टे वाडी नागपूर शहर, पोस्टे सावनेर हद्दीतील धापेवाडा येथून विधीसंघर्षग्रस्त बालक यांनी मिळुन एकुण ९ दुचाकी मोटर सायकली चोरी केले असल्याची माहीती दिली. त्यासंबंधी पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे मोटर सायकल चोरीचे गुन्हे नोंद होते. कळमेश्वर पोलीसांच्या सर्तकतेमुळे ६ मोटर सायकल चोरीचे गुन्हे उघड झाले. पोलीसांनी नमुद आरोपीकडुन चोरीस गेलेल्या एकुण ९ मोटर सायकल किंमती ४,६०,०००/– रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**नागपुर ग्रामीण पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, जर कोणी कमी किंमतीत दुचाकी किंवा इतर वाहन विक्री करीत असेल तर त्याची संपुर्ण कागदपत्रांची पडताळणी करून शाहनिशा करावी. वाहन खरेदी करतेवेळी काही संशयास्पद वाटल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती दयावी.**




## महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ (एमएनएलयू), नागपूर येथे घडलेल्या रॅगिंग प्रकरणी प्रसिद्ध झालेल्या वृत्ताबाबत वस्तुस्थिती

महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ (एम एन एल यू), नागपूर येथे घडलेल्या रॅगिंग प्रकरणी बुट्टीबोरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता मधील लागू तरतुदींनुसार संबंधित विद्यार्थ्यांना सूचना पत्र बजावुन चौकशीकरीता बोलाविण्यात आले. त्यानुसार संबंधित विद्यार्थी चौकशीसाठी हजर झाले होते. आवश्यक चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्यांना नियमानुसार सोडण्यात आले. तसेच कोणत्याही विद्यार्थ्यास अटक करण्यात आली नाही.

सर्व प्रक्रिया कायद्याच्या चौकटीत राहून पूर्ण करण्यात आली असून कोणाच्याही घटनात्मक किंवा कायदेशीर अधिकारांचे उल्लंघन करण्यात आलेले नाही.

## गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद

## ०८ गोवंश जनावरांची सुटका, खापा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन खापा** :— दिनांक १४/०७/२०२६ रोजी खापा पोलीसांनी अवैध धंदयांवर कारवाई करणेकामी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असता पेट्रोलींग दरम्यान गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांना मध्यप्रदेशकडुन एक संशयित कार क्र. एम एच—४६/एन—०५१० येताना दिसली. पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता यातील चालकाने पोलीसांना पाहुन त्याची कार कोच्छी फाटा येथे दुर अंतरावर वाहन थांबवुन अंधाराचा फायदा घेत पळुन गेला. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ०८ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून कार क्र. एम एच—४६/एन—०५१० किंमती ५,००,०००/— रूपये आणि ८ गोवंश जनावरे किंमती ८०,०००/— रूपये असा एकुण किंमती ५,८०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.

नमुद प्रकरणी कार क्र. एम एच—४६/एन—०५१० चा चालक यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन खापा येथे कलम ११(१), (सी), (डी), (जे), (के), (इ) प्राण्यांचा छळ अधिनियम १९६०, सहकलम ५ (अ), (ब), ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९९५, सहकलम ३२५ भा.न्या.सं., सहकलम ११९ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०७ गुन्हे नोंद

दिनांक १३/०७/२०२६ रोजी दारूबंदी कायदा विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू असा एकुण ८९६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन पाचगाव** येथे आरोपी नामे यश दिनेश बावरीया, वय २२ वर्ष, रा. कळमना, तह उमरेड याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे आरोपी अविनाश मारोती नारनवरे, वय ३५ वर्ष, रा. तास, ता भिवापुर, जि नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे चंदु उर्फ चंद्रप्रकाश वासुदेव वासे, वय ४६ वर्ष, राहणार सातगाव रिधोरा, तालुका हिंगणा, जिल्हा नागपुर याचे वर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे सुरेश ग्यानीराम लाडे, वय ३० वर्ष, रा. ग्राम आलेझरी, ता वासुनी, जि बालाघाट मध्यप्रदेश, ह. मु. लापका रोड मेश्राम आरो याचे घरा जवळ मौदा याचे वर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन केळवद** येथे ०२ महिला आरोपी यांचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे महादेव उमराव मोहणकार, वय ५२ वर्ष, रा. वार्ड क्र. ०६, नगरधन, ता. रामटेक याचे वर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण २४ लिटर मोहाफुल दारू, १४६६० लिटर देशी दारू असा एकुण ८९६०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०५ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

दिनांक १३/०७/२०२६ रोजी पोलीस स्टेशन उमरेड येथे अंमली पदार्थाचे सेवन करणारे आरोपीतांवर खालील प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**पोलीस स्टेशन उमरेड** अंतर्गत १) आरोपी राज अरून तांदुळकर, वय २४ वर्ष, रा. झोपडडपटी जवळ कावरापेठ उमरेड हा मौजा सोनेझरी गाव तलावा जवळ २) हारूण नासीर शेख, वय ३१ वर्ष, रा. दुर्गा शाळेजवळ कावरापेठ उमरेड हा मौजा कुंभारी रोड येथे ३) गौरव प्रमोद चाचरकर, वय २५ वर्ष, रा. दुर्गा शाळाजवळ कावरापेठ उमरेड हा उमरेड ते सेव रोड येथे ४) अयान अजीज शेख, वय २१ वर्ष, रा. दुर्गा शाळाजवळ कावरापेठ उमरेड हा मौजा गांगापुर उडान पुलीया खाली उमरेड येथे ५) शंशाक ईश्वर गवळी, वय २१ वर्ष, रा. मानव शक्ती ले आउट अनुप लॉन उमरेड हा अहिल्या होळकर सभागृह उमरेड येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले.

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७३७ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १४/०७/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २३ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७३७ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :– नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३४ आरोपी अशा एकुण ९५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :– उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४८ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २८ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २८ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १३ आरोपी अशा एकुण १४६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :–** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ६० आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे १९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३२ आरोपी अशा एकुण १४३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :– कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २० आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १४ आरोपी अशा एकुण ६७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :–** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे २६ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २६ आरोपी अशा एकुण १०४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :–** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ६४ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५१ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३८ आरोपी अशा एकुण १८२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २३ पोलीस स्टेशन येथे एकुण ७३७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**


पोलीस ठाणे वडोदा
ऑर्बिट


पोलीस स्टेशन
पारशिवनी






ORBIT
पोलीस ठाणे कुही
ऑर्बिट


ोलीस स्टेशन अरोली
दुरध्वनी क्रं: 07115.235499 जि. नागपुर ( ग्रा.)
ऑर्बिट
पोलीस स्टेशन अरोली